असा. क्र. २३ -रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, मे ४, २००५/वैशाख १४, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळें पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.**—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम | ३१९-३२१ |

दिनांक ३ मे २००५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला, महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ४ मे २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महा. ५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे.

## प्रकरण दोन

## मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याची सुधारणा.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ ची सुधारणा. **२.** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " ग्रामपंचायत अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ३ मध्ये, खंड (क-३) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९५९ चा मुंबई ३.

" (कक-१) " मतपेटी " किंवा " मतपत्रिका " यात, निवडणुकीच्या वेळी, मते देण्याकरिता किंवा मतांची नोंदणी करण्याकरिता, वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा समावेश होतो ; ".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ११ ची सुधारणा. **३.** मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ११ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (३क) निवडणुकीच्या वेळी मतदान, मतपत्रिकेद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे करण्यात येईल आणि बदली व्यक्तीद्वारे कोणतीही मते स्वीकारण्यात येणार नाहीत. ".

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची सुधारणा.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २ ची सुधारणा. **४.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये, खंड (२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९६२ चा महा. ५.

" (२क) " मतपेटी " किंवा " मतपत्रिका " यात, निवडणुकीच्या वेळी, मते देण्याकरिता आणि मतांची नोंदणी करण्याकरिता, वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा समावेश होतो ; ".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यामध्ये कलम १०क समाविष्ट करणे. **५.** जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम १० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

मतदानाची रीत. **" १०क.** परिषद सदस्यांच्या निवडणुकीच्या वेळी मतदान, मतपत्रिकेद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे करण्यात येईल आणि बदली व्यक्तीद्वारे कोणतीही मते स्वीकारण्यात येणार नाहीत.".

**६.** जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ५८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यामध्ये कलम ५८ क समाविष्ट करणे.

"**५८क.** सदस्यांच्या निवडणुकीच्या वेळी मतदान, मतपत्रिकेद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे करण्यात येईल आणि बदली व्यक्तीद्वारे कोणतीही मते स्वीकारण्यात येणार नाहीत.". मतदानाची रीत.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई